Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

January-2020

SPECIAL ISSUE-CCII

## Indian Economy in 21st Century:Issues & Challengs & Humanities




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
**Director**
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
**Principal**
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon Dist. Amravati

**Executive Editor:**
Dr.Sanjay J. Kothari
Deptt. of Economics,
G.S.Tompe
Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

# INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे सामाजिक विचार | डॉ. होमराज टी. राठोड | 1 |
| 2 | डॉ. बाबासाहेब रामजी आंबेडकर यांचे आर्थिक विचार | डॉ. विनोदकुमार चोपकर | 5 |
| 3 | महिला सुरक्षा आणि जागतिक कायदे | डॉ.राम प्र.ताटे/ डॉ.अर्चना शिवाजी वाघमारे | 7 |
| 4 | पर्यावरण, पाणी, तंत्रज्ञान आणि कृषी विकास | प्रा. डॉ. सुरेश रा. जगताप | 11 |
| 5 | आधुनिक तंत्रज्ञान प्रशिक्षणाचासंस्कृत विषय अध्यापनावरील परिणामाचे सर्वेक्षणात्मक अध्ययन | अरुण लक्ष्मीनारायण धकाते / डॉ.अमोल मांडेकर | 15 |
| 6 | सर्वधर्म समभाव : एक दृष्टीक्षेप | डॉ. जी.एस.महाडीक | 22 |
| 7 | भारतातील सामाजिक समस्या व प्रश्न | प्रा.डॉ. अनिल बी. वानखडे | 25 |
| 8 | कृषी पर्यटन आणि ग्रामीण विकास | प्रा. नंदकिशोर प्रेमचंद सिंगाडे | 28 |
| 10 | लोकशाही:बुध्द तत्वज्ञानाची महान देण | डॉ.मनोहर तुळशीराम कुंभारे | 32 |
| 11 | रोजगारभिमुख, कृषी केंद्रीत अर्थ संकल्प काळाची गरज | प्रा. डॉ. जयंत एम. वनसोड | 38 |
| 12 | भारतातील पहिल्या महिला डॉक्टर - डॉ. आनंदीबाई जोशी | मनिषा खंडाळे | 41 |
| 13 | स्वयंसहाय्यता संकल्पना | प्रा. डॉ. नंदा भाऊराव इंगळे | 44 |
| 14 | कार्यस्थल पर महिलाओं के साथ यौन उत्पीड़न (रोकथाम, निषेध और निवारण) अधिनियम २०१३. | डॉ.सुनिता संजय धोपटे | 46 |
| 15 | अमरावती जिल्ह्यातील संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या योजनांचा अभ्यास | डॉ .सुषमा देशमुख / डॉ. शितल पोहेकर | 52 |
| 16 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री दास्य विरोधी कार्य | डॉ. सिद्धार्थ बुटले | 58 |
| 17 | "The Pathetic Nirupama in Dowry: A Short Story by Rabindranath Tagore" | Prof. L.B.Gayakawad | 61 |
| 18 | Justice, Equality & Women Rights | Dr.Shipra S. Singam | 67 |
| 19 | Indian capital market scenario | Dr.Patil Bhagwan Shankar | 70 |
| 20 | Recent Trends in Agriculture In connection with GDP of Economy in India | Pravin R. Alshi | 75 |
| 21 | Contribution of dr. B.r. Ambedkar to the development of india | Prof. Kamlesh R Kamble | 86 |
| 22 | Non Performaing Assets In Indian Banking | Dr. Sou. Parvati Bhagwan Patil | 89 |




Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
January 2020

# कृषी पर्यटन आणि ग्रामीण विकास

प्रा. नंदकिशोर प्रेमचंद सिंगाडे

सहाय्यक प्राध्यापक ,अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.एल.डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स पवनी,
जिल्हा भंडारा

सारांश:- 'अतिथी देवो भव:' ही आपली भारतीय संस्कृती आहे. या संस्कृतीचा अनुबंध कृषिप्रधान भारताशी आहे. भारतीय संस्कृती ही मुख्यत: ग्रामीण भागाशी निगडित असल्याने प्रत्येकालाच आपल्या ग्रामीण संस्कृतीची ओढ असते. शहरातील धकाधकीच्या जीवनात कंटाळलेल्या प्रत्येक व्यक्तीला आनंद घेण्यासाठी निवांतपणे निसर्ग सान्निध्यात जावेसे वाटते म्हणून 'कृषी पर्यटन' हा अलीकडे झपाट्याने विकसित झालेल्या पर्यटनाचा प्रकार आहे.'गाव आणि गावपण' हरवत चाललंय असे आपण म्हणतोय परंतु आजही खेड्याची ओढ असलेले शहरी भागातले लोक आपल्या ग्रामीण संस्कृतीशी नाते टिकवून ठेवण्यासाठी आणि नवीन पिढीला या संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी खेड्यात जातात. कृषी पर्यटनाच्या संकल्पनेतून ग्रामीण भागाच्या विकासाचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. त्यादृष्टीने सदर शोधनिबंधात ग्रामीण भागातील कृषी क्षेत्रातील यशापयशाचा संशोधन पर निबंधातून थोडक्यात प्रकाशझोत टाकण्याचा शोधनिबंध लेखकाने प्रयत्न केला आहे.

प्रस्तावना:- पर्यटन म्हणजे मनोरंजन, पर्यटन म्हणजे साहस, पर्यटन म्हणजे व्यवसाय किंवा कामानिमित्त केलेला प्रवास होय. धकाधकीच्या जीवनात कामाच्या व्यापातून एक ते दोन दिवस मोकळीक मिळाली की, निवांतस्थळी निसर्गाच्या सान्निध्यात राहण्याची इच्छा माणसाच्या मनात असते. त्यामुळे भटकंतीला जाणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. पर्यटनामध्ये धार्मिक पर्यटनाबरोबरच अलीकडे सांस्कृतिक पर्यटन, खाद्यपर्यटन, पर्यावरण पर्यटन, वैद्यकीय पर्यटन, आणि झपाट्याने विकसित होणारे 'कृषी पर्यटन' यांचा समावेश होतो. पावसाळी, उन्हाळी व हिवाळी असे तीन मुख्य विभागात सध्याचं पर्यटन विस्तारल्याचं दिसतयं. उन्हाळ्यात थंड हवेच्या ठिकाणी होणारी गर्दी, गिरीभ्रमंती, अभयारण्यातील फेरफटका, गिर्यारोहणाची युवक वर्गात मोठी क्रेझ निर्माण झाली. दुर्ग-किल्ले, डोंगर दऱ्यांतील धरती पांढऱ्या शुभ्र धुक्याने लपटलेली... हिवाळयातील शाली नयन मनोहारी पर्यटनालाही प्रचंड प्रतिसाद मिळतो आहे. कृषी पर्यटन, साहसी पर्यटन आदी पर्यटनाच्या नवीन संकल्पना जनमानसात दृढ व्हाव्यात आणि या माध्यमातून रोजगार निर्मितीबरोबरच लाभार्थ्यांचा आर्थिक विकास व्हावा, या दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्य पर्यटन महामंडळ मार्फत 'महाभ्रमण' योजना राबविण्यात येत आहे

संशोधनाची उद्दिष्टे :-

1.कृषी पर्यटनामुळे ग्रामीण भागाचा विकास कसा झाला याचा अभ्यास करणे.

2. ग्रामीण भागातील कृषी व्यवसायाला मिळणाऱ्या संधीचे विश्लेषण करणे.

3. उच्च शिक्षित बेरोजगार तरुणांना कृषी पर्यटनामुळे मिळणाऱ्या संधीचे विश्लेषण करणे.

4. कृषी पर्यटनाची आवश्यकता व फायदे अभ्यासणे.

संशोधनाची गृहितके:-

1. उच्च शिक्षित बेरोजगार तरूण कृषी व्यवसायाकडे वळत आहेत.

2. इतर पर्यटनाच्या तुलनेत कृषी पर्यटनाकडे लोकांचा कल वाढत आहे.

3. कृषी पर्यटनामुळे कृषी व्यवसायाचा तसेच ग्रामीण भागाचा विकास होत आहे.

संशोधन पद्धती:-

प्रस्तुत संशोधनपर शोधनिबंधासाठी पूर्णपणे दुय्यम साधनसामुग्रीचा वापर करण्यात आला आहे. त्यासाठी विविध वर्तमानपत्रे, साप्ताहिके ,मासिके ,अहवाल, वार्षिकांक इत्यादींचा संदर्भ म्हणून वापर करण्यात आलेला आहे.संबंधित माहिती वरील संदर्भातून घेण्यात आलेली आहे.



Scanned with OKEN Scanner